# कोविड–१९च्या संदर्भात सी.एस.आर. अंतर्गत अत्यावश्यक सेवेतील हाफकिन महामंडळाचे विशेष कार्य

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागांतर्गत दिनांक २४.०३.२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्रमांक आव्यप्र–२०२०/प्र.क्र. ९२/आव्यप्र–१ अनुसार कोविड १९ या संसर्गजन्य आजारावर उपचाराकरिता आवश्यक वैदयकिय वस्तू, साधने दात्यांकडून स्वीकारण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या वतीने कार्यकारी संचालक, हाफकिन जीव–औषध निर्माण महामंडळ (मर्या.) यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

करोनाचा सामना करण्यासाठी राज्यभरातून विविध कंपन्या, संस्था, अशासकीय संस्था, व्यक्ती, आस्थापना या सढळ हस्ते सी.एस.आर. अंतर्गत मोठया प्रमाणावर वैदयकिय साहित्यांची मदत करित आहेत. दात्यांकडून येणारे साहित्य गाडयांमधून उतरविण्यापासून त्यांची नोंद करण्यापर्यंत सर्व कामे हाफकिन महामंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी दिवसरात्र करित आहेत. वैदयकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव यांच्या सल्ल्यानुसार महाराष्ट्र राज्यातील विभागीय आयुक्तांमार्फत सर्व शासकिय रुग्णालये आणि शासकिय महाविदयालयांना मिळालेले साहित्य वितरीत करण्यात येत आहे.

आजपर्यंत एल ॲण्ड टी लिमिटेड, हायकल लिमिटेड, अमेरिकेअर इंडिया फाउंडेशन, हुंडाई मोटर्स लिमीटेड, सिमेन्स लिमिटेड, विप्रो लिमिटेड, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, टेक महिंन्द्रा, महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेड, गोदरेज इंडस्ट्रिज, मीर फाउंडेशन, रोटरी क्लब, डेटॉल कंपनी, हिंदुस्थान युनिलिवर, एचडीएफसी लिमिटेड, पिरामल स्वास्थ्य मॅनेजनेंट इन्स्टीटयुट, मेथीबाई देवराज गुंडेचा फाउंडेशन, रेकीट बेन्कीसर लि., स्पोर्टा टेक्नॉलजी प्रा. लि. ड्रीम ११, इ. यासारख्या अनेक कंपन्यांनी व सामाजिक संस्थांनी मोठया प्रमाणावर मदत केली आहे. पीपीई कीट, व्हेटीलेटर्स, एन ९५ फेस मास्क, सीरींज पंम्प, फावलर बेड, हॅण्ड सॅनीटायझर, प्रोटेक्टीव्ह गॉगल, हॅण्ड ग्लोव्हज, पल्स ऑक्सीमिटर फिंगर, फेस शिल्ड, फ्लोर

क्लीनर, सरफेस डिसइंन्फेक्टंट, मल्टीपॅरा मॉनिटर, इत्यादी उपकरणे दात्यांमार्फत हाफकिन महामंडळाला प्राप्त झाली आहेत.

दिनांक १४.०७.२०२० पर्यंत सीएसआरच्या माध्यमातून विविध दात्यांमार्फत हाफकिन महामंडळाला मिळालेल्या साहित्यांची माहिती –

| अ.क्र. | साहित्याचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १ | एन – ९५ फेस मास्क | ४,७५,४८९ |
| २ | मेडीकल प्रोटेक्टीव्ह मास्क, एफ एफ पी २,३ आणि ३प्लाय फेसमास्क | २३,३०,७४० |
| ३ | पीपीई किट आणि प्रोटेक्टीव्ह क्लोथ | १,९०,००८ |
| ४ | हॅण्ड ग्लोव्हज | १,५२,१०० |
| ५ | हॅण्ड सॅनिटायझर (विविध आकारमानाचे) | ४,६०,३१८ |
| ६ | डेटॉल सोप | ३,००,००० |
| ७ | सरफेस ॲण्ड एरीयल डिसइंन्फेक्टंट | १,७८,८०० |
| ८ | लाईफबॉय सोप ॲण्ड हॅण्ड वॊश | ८७,४६८ |
| ९ | फेस शिल्ड | ७६,२५० |
| १० | व्हेंटीलेटर | १८९ |
| ११ | प्रोटेक्टीव्ह आणि सेफ्टी गॉगल | ३४,२८० |
| १२ | अस्थमा इन्हेलर | १०,००० |
| १३ | मल्टी पॅरा मॉनिटर १२ आणि १५ इंच | ६३ |
| १४ | इंन्फ्रारेड थर्मोमिटर | २५२ |
| १५ | सीरींज पंम्प | १०० |
| १६ | कोविड टेस्टींग किट | २८० |
| १७ | सर्जिकल कॅप्स् | २,२५० |
| १८ | फावलर बेड | १२५ |
| १९ | मेट्रेसेस | ३७ |
| २० | बेडशिट | १९९ |

| | | |
|---|---|---|
| २१ | पल्स ऑक्सीमिटर फिंगर | १५ |
| २२ | पल्स ऑक्सीमिटर टेबल | १० |
| २३ | शू कव्हर | ३,००० |
| २४ | फ्लोर क्लीनर | २,०१६ |
| २५ | बायोडिग्रेडेबल वेस्ट बॅग | ५०० |

- दि. २४ मार्च २०२० पासून सुरू झालेले काम हे **११५ दिवस २४ x ७** अविरत व अखंडीत स्वरूपात हाफकिन महामंडळ करित आहे व शासनाच्या पुढील आदेशापर्यंत चालू राहणार आहे.

- हाफकिन महामंडळामध्ये एक स्वतंत्र '**कोविड—१९ सी.एस.आर. अंतर्गत मदत स्वीकृती कार्यालय**' तयार करण्यात आले आहे.

- हाफकिन महामंडळाच्या कोविड—१९ सी.एस.आर. अंतर्गत मदत स्वीकृती कार्यालयात **११० कर्मचारी** कार्यरत आहेत. सर्व कर्मचाऱ्यांचे दरदिवशी महामंडळात प्रवेश करताना टेम्परेचर थर्मोमीटर आणि ऑक्सीमीटरने चाचणी करण्यात येते. महामंडळाकडून सर्व कर्मचाऱ्यांना फेसमास्क, हॅण्डग्लोव्हज, पीपीई कीट देण्यात आले आहे. हात निर्जंतुक करण्याकरिता हॅण्ड सॅनिटायझर आणि साबण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. काम करताना फिजीकल डिस्टंन्सीगच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करण्यात येते.

- दि. १५ जुलै २०२० पर्यंत हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी **४३५ वाहनांतील** वैदयकीय साधने उतरविणे आणि भरण्याचे काम केले आहे.

- हाफकिन महामंडळात प्रवेश केल्यानंतर प्रत्येक वाहनाचे आतून व बाहेरून निर्जंतुकीकरण करण्यात येते. बाहेरून येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची टेम्परेचर थर्मोमीटर आणि ऑक्सीमीटरने चाचणी करण्यात येते.

- हाफकिन महामंडळातील सुरक्षित आणि सीसीटीव्ही च्या देखरेखीखाली असलेल्या **११ गोडाऊनमध्ये** मिळालेल्या वैदयकीय साधनांचा साठा करण्यात येतो.

- दात्यांकडून वैदयकीय साधने स्वीकारल्यानंतर त्यांना सही, शिक्क्यासह पोचपावती देण्यात येते.

- सीएसआरच्या माध्यमातून हाफकिन महामंडळाला प्राप्त झालेल्या वैदयकीय साधनांची अंदाजित किंमत **रु. १११ कोटी ८० लाख** आहे.

- दात्यांकडून प्राप्त झालेल्या आणि वितरीत करण्यात आलेल्या सर्व वैदयकीय साधनांची संगणकामध्ये नोंद ठेवण्यात येते. हाफकिन जीव—औषध निर्माण महामंडळाच्या www.vaccinehaffkine.com/covid-19-donations.html या अधिकृत संकेतस्थळावर सर्व दात्यांची व त्यांनी दिलेल्या साहित्यांची माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. दरदिवशी प्राप्त झालेल्या वैदयकिय साहित्यांची नोंद हाफकिन महामंडळाच्या वरील नमूद अधिकृत संकेतस्थळावर अद्यायावत करण्यात येते.